**मिरा-भाईंदर ,वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**सायबर गुन्हे शाखा**
३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर – ०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेस नोट :-१८-२२ दिनांक – २२/०१/२०२२

# Facebook वर कमी किमतीत आयफोन देण्याचे आमिष दाखवुन आर्थिक फसवणुक करणाऱ्या आरोपीस पकडण्यात सायबर गुन्हे शाखेस यश

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत नवघर पोलीस ठाणेचे हद्दीत राहणाऱ्या तक्रारदार महीला यांना फेसबुकवर कमी किमतीत इलेक्ट्रॉनिक वस्तु तसेच आयफोन-१३ हा मोबाईल देतो असे आमिष दाखवुन त्याद्वारे अनोळखी इसमाने ऑनलाईन १८०००/- रुपयाची फसवणुक केलेबाबत तक्रारी अर्ज सायबर गुन्हे शाखा आ.क्र.७६७/२०२१ दिनांक २७/१२/२०२१ अन्वये झाला.

सायबर गुन्हे शाखेने तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीबाबत तात्काळ चौकशी सुरु करुन तांत्रीक माहीतीच्या आधारे दिनांक १९/०१/२०२२ रोजी संशयित **१.भरतकुमार जैन २. संध्या विजय दाभाडे दोन्ही रा.स्पेस गॅलेक्सी,रुम नंबर.१०६,प्लॉट नंबर २४९,सेक्टर-१७,उलवे नवी मुंबई** यांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर प्रकरणामध्ये चौकशी अंती आरोपींविरुध्द **नयानगर पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रमांक २५/२०२२ कलम ४२०,३४ भादंविसं, आयटी ॲक्ट ६६ (सी), ६६ (डी) अन्वये** नोंद करण्यात आला असुन संशयित आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. नमुद गुन्हयाचा तपास पोनि/ओझा, नेमणुक - नयानगर पोलीस ठाणे, संपर्क क्रमांक – ९८२१२३५७२५ हे करीत आहेत.

नमुद आरोपीतांविरुध्द **एन आर आय सागरी पोलीस ठाणे गु.रजि.नंबर २२० दिनांक १७/०९/२०२१ भादविस कलम ४२० प्रमाणे** यापुर्वी गुन्हा नोंद आहे.

तसेच तपासामध्ये त्याने खालील बँक खाते क्रमांक/ फेसबुक आयडी गुन्हा करण्यासाठी वापरले असल्याची माहिती दिली आहे.

| अ.क्र. | तपशील | |
|---|---|---|
| ०१ | **Facebook ID** | https://www.facebook.com/profile.php?id= 100074302143160 |
| ०२ | बँक खाते क्रमांक | Sandhya Dabhade<br>Central Bank of India Account no:3989126880,IFSC code: CBIN0284519 |

सायबर गुन्हे शाखा, मिरा,भाईंदर-वसई,विरार पोलीस आयुक्तालय यांचेकडुन जनतेला आवाहन करण्यात येते की, Facebook ID - https://www.facebook.com/profile.php?id= 100074302143160 तसेच वरील बँक खात्यांशी संबधित इलेक्ट्रॉनिक वस्तु/मोबाईल कमी किमतीत मिळवुन देतो असे आमिष दाखवुन आर्थिक फसवणुक झालेली असल्यास नजीकच्या पोलीस ठाणेस अथवा सायबर गुन्हे शाखा, मिरा,भाईंदर-वसई,विरार पोलीस आयुक्तालयाचे कार्यालयाशी तात्काळ संपर्क साधावा.

सदरची कामगिरी डॉ.श्री.महेश पाटील,पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, पोउपनिरी संतोष भिसे, पोशि/२०७२ गणेश इलग,मपोशि/ पल्लवी निकम यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.

---oo---